प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. १२.०८.२०२०**

## सिडकोतर्फे खास पोलिसांसाठी साकारण्यात आलेल्या गृहनिर्माण योजनेस मिळतोय उत्तम प्रतिसाद

सिडकोतर्फे पोलिसांसाठी असलेल्या 4466 घरांच्या योजनेचा शुभारंभ मा. मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांच्या शुभहस्ते सोमवार दिनांक 27 जुलै 2020 रोजी व्हिडीओ कॉन्फरंसिंगच्या माध्यमातून करण्यात आला होता. या योजनेस पोलिसांकडून अतिशय उत्तम प्रतिसाद मिळात असून आजपर्यंत 3500 पोलिसांनी या गृहनिर्माण योजनेच्या संकेतस्थळास भेट दिली आहे तर 1520 पोलिसांनी या गृहनिर्माण योजनेत नोंदणी केली आहे.

सदर गृहनिर्माण योजने अंतर्गत पोलीस कर्मचाऱ्यांकरिता नवी मुंबईतील तळोजा, खारघर, कळंबोली, घणसोली आणि द्रोणागिरी या पाच नोडमध्ये 4,466 सदनिका साकारण्यात येत आहेत. प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गट यांकरिता उपलब्ध असणाऱ्या या योजनेतील सदनिका या केवळ मुंबई महानगर क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांकरिताच राखीव आहेत. एकूण 4,466 सदनिकांपैकी 1,057 सदनिका या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी आणि 3,409 या अल्प उत्पन्न गटासाठी उपलब्ध आहेत.

सदर योजनेकरिता अर्जदारांची नोंदणी, शुल्क भरणा, सोडत इ. सर्व प्रक्रिया या अत्यंत सुलभ व पारदर्शक अशा ऑनलाइन पद्धतीने पार पडणार आहेत. याकरिता https://lottery.cidcoindia.com हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. सिडकोतर्फे साकारण्यात येत असलेल्या या गृहनिर्माण योजनेतील घरे अत्यंत माफक दरात व उत्तम दर्जाची असून या योजनेच्या माध्यमातून पोलिसांचे घराचे स्वप्न पूर्ण होणार आहे.

---

मा.संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धी देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**